# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli

**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**

**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २९/०७/२०१९

## " पोलीस नक्षल चकमकीत एक महिला माओवादी ठार "

### → आदिवासी विकास सप्ताहात पोलीसांना मोठे यश

उपविभाग गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या पोमके पोटेगांव हद्दीतील फुसेर- गरंजी जंगल परिसरात गडचिरोली पोलीस दलातील सी -६० चे जवान नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना सकाळी ११.३० ते १२.०० वा चे दरम्यान दबा धरुन बसलेल्या नक्षलवाद्यांनी पोलीसांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने पोलीसांचे दिशेने गोळीबार केला असता प्रत्युत्तरादाखल व स्वसंरक्षणार्थ सी-६० जवानांनी गोळीबार केला. नक्षलवाद्यांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत घटनास्थळावरुन पळ काढला.

घटनेनंतर सदर जंगल परिसरात शोध अभियान राबविले असता एक महिला माओवादी मृतावस्थेत मिळुन आली.त्याचबरोबर घटनास्थळावरुन मोठया प्रमाणात नक्षल साहित्य हस्तगत करण्यात आले. मिळुन आलेल्या मृत महिला माओवादीची ओळख पटविण्याचे कार्य सुरु आहे.

सदर चकमकीत आणखी ४ ते ५ माओवादी जखमी असल्याची शक्यता असुन सदर माओवादी हे आश्रयासाठी गावात जाण्याची शक्यता आहे. जखमी माओवाद्यांना गावक-यांनी गावबंदी करावी तसेच परिसरात जखमी माओवादी मिळुन आल्यास तात्काळ पोलीस प्रशासनास माहिती द्यावी. माहिती देणा-याचे नांव गुप्त ठेवण्यात येईल व योग्य ते बक्षिस देण्यात येईल त्याचबरोबर आदिवासी विकास सप्ताहाचे निमीत्त्याने नक्षलवाद्यांनी मोठया प्रमाणावर आत्मसमर्पण करुन विकासाच्या मुळ प्रवाहात सामील व्हावे असे आवाहन मा.पोलीस अधिक्षक सा़ो, गडचिरोली श्री.शैलेश बलकवडे यांनी केले आहे. त्याचबरोबर चकमकीत सहभागी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या शौर्याचे कौतुक करत त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मा.पोलीस अधिक्षकांनी जवानांचे अभिनंदन केले आहे.